सं.फौ.ख. क्र. १६७/२०१५
<u>नि. क्र. २९</u>

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**
शपथेवर सत्य निवेदन करतो की,
**नाव** – **अरविंद बाबुराव पायाळ**
**वय** – ५६ वर्षे, **व्यवसाय**– नोकरी,
**राहणार** – अंकुश नगर, बीड, जि. बीड.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी विधिज्ञ श्री. के. टी. उगलमुगले यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

**१.** उदगीर येथे मी वन परिमंडळ अधिकारी या पदावर दिनांक ०७/०९/२०१४ रोजीपासून कार्यरत होतो. वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, अहमदपूर यांचे अंतर्गत वन परिमंडळ उदगीर हे कार्यालय येते. दि.१३/०९/२०१४ रोजी आम्ही आरा गिरणीवर (सॉ मीलवर) कारवाई केली होती. सदर मीलच्या मालकाचे नाव मला आठवत नाही. सदर मीलचा मालक आज रोजी न्यायालयात हजर आहे. त्या कारवाईत आमचे सहाय्यक वन संरक्षक अधिकारी, लातूर, वन परिक्षेत्र अधिकारी, अहमदपूर तसेच वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचे सर्व कर्मचारी असे आम्ही सामील होतो. तसेच पोलीस विभागाचे कर्मचारी देखील त्या कारवाईत सामील होते. आम्ही सर्वजण नळेगाव रोड येथे गेलो. त्या ठिकाणी आरा गिरणीची तपासणी केली. त्यानंतर संबंधित व्यक्तीकडे परवान्याची मागणी केली. परंतु त्या व्यक्तीकडे परवाना नव्हता. त्यानंतर नियमाप्रमाणे त्या व्यक्तीविरूद्ध कारवाई करून आरा यंत्र व डिझेल इंजिन जप्त केले. त्या ठिकाणी हेळंब, लिंब इत्यादी वनस्पतींची असलेली लाकडे जप्त केली. त्याबाबत पंचनामा केला. आता मला पंचनामा दाखविला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी, वन परिक्षेत्र अधिकारी, वनरक्षक अधिकारी यांच्या सह्या आहेत. तसेच त्यावर पंचांच्या देखील सह्या आहेत. त्यास **नि.क्र.३०** देण्यात येते. त्यानंतर आरोपीचा जबाब नोंदवून घेतला.

२. सदर घटनेविषयी मी फिर्याद दाखल केली होती. आता मला सदर फिर्याद दाखविली. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्या फिर्यादीस **नि.क्र.३१** देण्यात येते. त्यानंतर पोलिसांनी मला बोलाविले नाही.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.एस. हुल्ले यांच्यामार्फत उलटतपास सुरू.**

३. कथित आरा गिरणीविषयी कोणाकडून माहिती मिळाली, ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर आरा गिरण कोण चालविते व कोणाच्या मालकीची आहे, याची मला माहिती मिळाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरा गिरणीचा परवाना मिळविण्यासाठी आमच्या ऑफिसमार्फत अर्ज करावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की, अर्ज करण्यापूर्वी संरक्षक भिंत व फाऊंडेशन या बाबी पाहिल्या जातात. उदगीर येथील ६ व्यक्तींची आरा गिरण मिळण्याबाबत मागणी होती किंवा कसे, मला माहिती नाही. त्याबाबतचे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित होते किंवा कसे, मला माहिती नाही.

४. कथित आरा गिरणीला आम्ही नोटीस दिली होती. सदर नोटीस दिलेली तारीख मला आठवत नाही. सदर नोटीस कारवाई करण्यापूर्वी किती दिवस अगोदर दिली, हे मला आठवत नाही. सदर नोटीस वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, अहमदपूर यांच्यामार्फत दिली होती. ती नोटीस मी पाहिली नव्हती. उपस्थित राहण्याबाबत मी पोलिसांना पत्र पाठविले नव्हते. कथित आरा गिरणीवर कारवाई करण्याबाबत आमच्या कार्यालयास आमच्या वरिष्ठांकडून पत्र आले नव्हते. कारवाई करण्यापूर्वी कथित आरा गिरणीची माहिती मी वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, अहमदपूर यांना दिली होती. ती माहिती दिल्याची तारीख मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कारवाई करण्याचे अधिकार मला नाहीत. किती वाजता कारवाई केली, हे मला आठवत नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, नळेगाव रोड हा रहदारीचा रोड आहे. पंचनाम्याकरिता स्वतंत्र पंच म्हणून कोण घेतले, मला आठवत नाही. साक्षीदार पुन्हा

सांगतो की, सदरचे पंच हे स्वतंत्र पंच आहेत. श्रीमंत बिरादार व देविदास ढोमाळे हे आमच्या कार्यालयातील कर्मचारी नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, ते दोघेही आमच्या कार्यालयाचे वन मजूर म्हणून कार्य करत होते. श्रीमंत बिरादार व देविदास ढोमाळे हे आज रोजी वन मजूर म्हणून आमच्या कार्यालयातर्फे काम करतात किंवा कसे, मला माहिती नाही. सदर दोन्ही पंच उदगीर तथा नळेगाव रोड येथील आहेत किंवा कसे, मला माहिती नाही.

६. दिनांक १३/०९/२०१४ रोजी मी अहमदपूर येथे गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीवर आवक जावक नोंद नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझ्या कार्यालयामध्ये आवक जावक नोंदवही ठेवलेली नसते. फिर्याद दाखल केल्यानंतर नि.क्र.३१ वरील फिर्याद माझ्याकडे आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद दाखल केल्यानंतर माझा सर्व रोल संपला. दिनांक १३/०९/२०१४ नंतर मी काही केले नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, हेळंब, लिंब या वनस्पतींची लाकडे सरपणासाठी वापरतात. सदर वनस्पतींची लाकडे इमारतीकरिता वापरतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी दुसऱ्याच्या नावावरील परवाना घेवून सदर लाकडे ताब्यात बाळगून होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर लाकडे ही छोटी छोटी असून ती सरपणाकरिता ठेवली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर लाकडे मी जप्त केली नाहीत. जप्त केल्यानंतर सदर लाकडे कोठे ठेवली, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या लाकडांबाबत मुद्देमाल पावती तयार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुद्देमाल पावती या प्रकरणात दाखल नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही नळेगाव रोड येथे गेल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी आरा गिरण, डिझेल इंजिन, हेळंब व लिंबाची लाकडे जप्त केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी पंचनामा केल्याचे व आरोपीचा जबाब नोंदविल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की,

आरोपीला आरा गिरणीचा परवाना मिळू नये म्हणून व इतर ६ आरा गिरणी मालकांच्या सांगण्यावरून आरोपीविरूद्ध खोटी कारवाई केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरूद्ध मी खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणताही गुन्हा केला नाही.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2025.09.25 18:25:27 +0530

**( के. ए. यादव )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) उदगीर

दिनांक :– २५/०९/२०२५